**नि.फौ.के. नं. ११६/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. विजय**
**निशाण क्र. २४ लगत**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपी हा इतर गुन्हयांत कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह येथे असल्याने त्यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे सदर आरोपीस हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०९ – सचिन नामदेव कामेरकर यांचा सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून पुढील सरतपास शपथेवर, सुरु –**

*(दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व साक्षीदाराचे साक्षीतील कथन तसेच सदर ठाणे दैनंदिनीचा उतारा पाहिला असता, अभियोगपक्षातर्फे करण्यात आलेला जास्त संयुक्तिक वाटतो. त्यामुळे, त्यास पुढील* ***निशाणी क्रमांक ३६*** *देण्यात येत आहे).*

२१. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०२३/२०२५ चा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्रीमती कांगणे यांची स्वाक्षरी आहे. अंगुली मुद्रा तज्ञ घटनास्थळी भेट देण्याकामी रवाना झालेबाबत सदरची नोंद आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***ओळखीकरीता वस्तु – ड*** *देण्यात येते).*

२२. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०२४/२०२५ चा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्रीमती कांगणे यांची स्वाक्षरी आहे. फॉरेन्सीक विभाग तज्ञ घटनास्थळी भेट देण्याकामी रवाना झालेबाबत सदरची नोंद आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***ओळखीकरीता वस्तु – इ*** *देण्यात येते).*

२३. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०२९/२०२५ चा उतारा दाखविला). तो*

*तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्रीमती कांगणे यांची स्वाक्षरी आहे. घटनास्थळावर पंचनामा व मुद्देमाल जप्त करुन पोलीस ठाण्यात परत आलेबाबतची सदरची नोंद आहे. ती नोंद मी स्वतः केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक ३७*** *देण्यात येते).*

२४. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०२४/२०२५, दिनांक ३१/१०/२०२५ रोजीचा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्री. संदिप जाधव यांची स्वाक्षरी आहे. जप्त केलेला मुद्देमाल मुद्देमाल कारकुनाच्या ताब्यात देण्यात आलेबाबतची सदरची नोंद आहे. ती नोंद मी स्वतः केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक ३८*** *देण्यात येते).*

२५. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०१३/२०२५, दिनांक २३/१२/२०२५ रोजीचा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्रीमती कळमकर यांची स्वाक्षरी आहे. आरोपीने गुन्हयाचे ठिकाण दाखवितो असे सांगितल्याने त्याला घेवुन त्याठिकाणी जात असलेबाबतची सदरची नोंद आहे. ती नोंद मी स्वतः केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक ३९*** *देण्यात येते).*

२६. *(साक्षीदारास ठाणे दैनंदिनी ०१६/२०२५, दिनांक २३/१२/२०२५ रोजीचा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर ठाणे अंमलदार – श्रीमती कळमकर यांची स्वाक्षरी आहे. आरोपीने गुन्हयाचे ठिकाण दाखवितो असे सांगितल्याने त्याला घेवुन त्याठिकाणी जावुन खात्री करुन परत आलेबाबतची सदरची नोंद आहे. ती नोंद मी स्वतः केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक ४०*** *देण्यात येते).*

२७. आरोपीविरुध्द तपासादरम्यान मी दाखल सागरी पोलीस ठाणे, नाटे, जि. रत्नागिरी येथील गुन्हा नोंदणी क्र. ७७/२०२५ ची प्रथम खबरी अहवालाची छायांकित प्रत हस्तगत करुन ती अभिलेखावर समाविष्ठ केली आहे. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्यकडुन</u> –**

२८. मी मागील १० महिन्यांपासुन देवरुख पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नेटवर्क नसल्यास ई–साक्ष प्रणाली कार्यान्वीत नसते. हे म्हणणे खरे नाही की, नेटवर्क नसल्यास ई–साक्ष प्रणाली मा.ना. उच्च न्यायालय यांच्याशी जोडली जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, ई–साक्ष प्रणालीवर भारीत केलेल्या चित्रीकरणांची वेगळी सी.डी. आरोपीला देण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत चित्रीकरण खोटे आहे.

२९. हे म्हणणे खरे आहे की, आदमापुर देवस्थान, जि. कोल्हापुर येथील संस्थानाकडे मी तपासादरम्यान चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार – गणेश माने याने त्याचा मोबाईल, आधारकार्ड व सिमकार्ड चोरीला गेलेबाबत त्याने किंवा त्याच्या वडीलांनी तक्रार केलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी हस्तगत केला नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, गणेश माने याने अशी कोणतीही तक्रार दिलीच नाही.

३०. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार – रमेश भिकाजी किंजळे यांचे तपासटिपण मी नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदार – रमेश किंजळे याचा मी जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ताम्हाणे व कोसुंब ही दोन्ही वेगवेगळी गावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कोसुंब, समर्थमठ यांच्या विश्वस्तांची मी तपासटिपणे नोंदविली नाहीत. साक्षीदार पुढे सांगतो की, तो मठ रमेश किंजळे यांच्या वैयक्तिक मालकीचा आहे.

३१. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे, आरोपीने गुन्हयाचे ठिकाण दाखवितो असे सांगितल्यानंतर त्याला घेवुन जातानाचे सर्व चित्रीकरण ई–साक्ष मध्ये भारीत करणे आवश्यक होते. साक्षीदार पुढे सांगतो की, तपासादरम्यान आरोपीने तसे सांगितल्याने आम्ही त्या ठिकाणी गेलो होतो. परंतु, त्याची ई–साक्ष करणे आवश्यक

नाही. हे म्हणणे खरे नाही की, याबाबत ई–साक्ष करणे आवश्यक नसल्याचे मी खोटी कथन करीत आहे.

**३२**. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा घटनास्थळ पंचनामा माझ्या म्हणण्याप्रमाणे, लॅपटॉपवर टंकलिखीत केलेबाबत मी माझ्या सरतपासात कथन केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, लॅपटॉपवर पंचनामा टंकलिखीत करीत असल्याचे बाब निशाणी क्रमांक २६ कडील छायाचित्रांमध्ये दिसुन येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे अक्षांश व रेखांश घटनास्थळ पंचनाम्यामध्ये व घटनास्थळ नकाशा मध्ये नमुद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा व नकाशा यांमध्ये तफावत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक १३ कडील घटनास्थळ पंचनाम्यामध्ये वस्तु – क कडील जीन्स पँट दर्शविण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या ताब्यातुन मी तथाकथीत ट्रॅक पँट जप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा घटनास्थळी गेलेलाच नव्हता व त्याने घटनास्थळावरुन ट्रॅक पँट घेतलेली नाही.

**३३**. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पंच हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पंचांच्या मी पोलीस ठाण्यामध्ये कोऱ्या कागदावर सहया घेतल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फॉरेन्सीक विभागाकडून आरोपीविरुध्द आक्षेपार्ह असा कोणताही पुरावा मला मिळालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमुद केलेले सर्व दस्तऐवज खोटे व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर तथाकथीत घटनास्थळी गणेश माने याने जावुन चोरीचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द कोणताही पुरावा नसताना चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

**३४**. हे म्हणणे खरे आहे की, सागरी पोलीस ठाणे, नाटे, जि. रत्नागिरी येथील गुन्हयात आरोपी दोषसिध्द झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार मनिष मधुकर महाडीक याचे तपासटिपण मी त्याच्या सांगण्यानुसार नोंदविले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदाराने *''त्यादिवशी सकाळी फेरफटका मारण्यासाठी*

*फिर्यादीच्या घराच्या बाजुकडे गेलो होतो. फिर्यादी – संजयकुमार गंगाराम महाडीक हे माझे काका आहेत. त्यावेळी त्यांच्या घराच्या अंगणात मला भांडी दिसुन आल्याने मी पुढे पाहण्यासाठी गेलो असता, त्यांच्या घराचा मागचा दरवाजा उघडा दिसला. त्यानंतर मी काकांना फोन करुन घराचा पाठीमागचा दरवाजा उघडा असल्याचे सांगितले असता, त्यांनीमला आत जावु नको, असे सांगितले त्यामुळे मी काकांची वाट पाहत तेथेच थांबलो होतो. काका आल्यानंतर पोलीस पाटील – श्री. खाके यांच्यासोबत आम्ही पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलो. त्यानंतर त्याठिकाणी पोलीस आले. पोलीसांनी तेथे पाहणी केली. त्यानंतर, पुन्हा आम्ही पोलीस ठाण्यात जावुन रितसर तक्रार नोंदविली''*, हा मजकुर त्याचे तपास टिपण नोंदविताना सांगितला नव्हता.

**३५**. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार दिपराज सुरेश महाडीक याचे तपासटिपण मी त्याच्या सांगण्यानुसार नोंदविले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर साक्षीदाराने त्याचे तपासटिपण नोंदविताना पोलीस कोणत्या गुन्हा नोंदणी क्रमांकाच्या कामी आले होते, हे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, महिला पोलीस कर्मचारी श्रीमती कुरणे यांनी प्रस्तुत गुन्हयाकामी कोणतीही छायाचित्रे घेतली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने तथाकथीत घटनास्थळी जावुन कधीही चोरीचा प्रयत्न केलेलाच नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा असुन आज रोजी मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक ०२/०५/२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 02/05/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 02/05/2026 |
| Evidence uploaded on | :- | 02/05/2026 |